# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २९/०७/२०२४ (सोमवार) दुपार

---

## पो.स्टे. कळमेश्वर हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड
## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक २८/०७/२०२४ रोजी पोस्टे कळमेश्वर येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील बाजार चौक कळमेश्वर येथील माता मंदीर समोरील गल्लीत काही इसम ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती प्राप्त झाले वरून सदर पथकाने माता मंदीर समोरील गल्लीत सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे—१) लतीफ जब्बार शेख वय ३० वर्ष रा. वार्ड क्र. १७ मातापुरा कळमेश्वर २) वसीम नबी शेख वय ३१ वर्ष रा. वार्ड क्र. १७ मातापुरा कळमेश्वर ३) हर्षद राजेश्वर काटवे वय ३५ वर्ष रा. वार्ड क्र. १६ बस स्टॉप मागे कळमेश्वर ४) चंद्रकांत जगदीश तांबेकर वय ३९ वर्ष रा. दहीपुरा कळमेश्वर ५) आसीफ लतीफ शेख वय २६ वर्ष रा. वार्ड क्र १७ मातापुरा कळमेश्वर ६) राजु दादाराव खोब्रागडे वय ३८ वर्ष रा. वार्ड क्र.१० देशमुख ले आउट कळमेश्वर ७) कयुब जब्बार शेख वय ४८ वर्ष रा. वार्ड क्र १७ मातापुरा कळमेश्वर** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०७ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन आरोपीतांकडुन १) ४ मोबाईल फोन किंमती ३८,०००/—रू. २) नगदी ४८३०/—रू. ३) ५२ तास पत्ते व २ तासपत्याचा कॅट असा **एकुण मुद्देमाल ४२८३०/— रू.** जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे कळमेश्वर कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे कळमेश्वर येथील ठाणेदार योगेश कामाले, पोउपनि मनोज टिपले, पोहवा अंकुश लाखे, पोना अनिस शेख, दिनेश गाडगे, हितेंद्र चौधरी यांनी पार पाडली.

## अवैध दारूची तस्करी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध धडक मोहीम

दिनांक २८/०७/२०२४ रोजी पोस्टे कुही येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, एक इसम अवैधरीत्या देशी दारू बाळगुन विक्री करीत आहे. अशा माहिती वरून **आरोपी नामे— टेकचंद उर्फ विशाल नत्थुजी जैस्वाल रा. तितुर ता. कुही जि. नागपूर** याचे घराची दारूबाबत झडती घेतली असता त्याचे ताब्यातून कापडी थैलीमध्ये देशी दारू भिंगरी संत्रा नं. ०१ च्या १४ निपा प्रति निप १८० एम एल मापाने भरलेली प्रति निप ७० रू प्रमाणे एकुण ९८० रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली. तसेच **आरोपी धर्मरक्षीत भगवान पाटील वय ५४ वर्ष रा. सातारा ता. कुही जि. नागपूर** आपले राहते घरी किराणा दुकानात अवैधरीत्या देशी दारूची विक्री करीत आहे. अशा माहिती वरून आरोपीचे किराणा दुकानाची झडती घेतली असता आरोपीकडुन देशी दारू भिंगरी संत्रा नं. ०१ च्या ६१ निपा प्रति निप ९० एम एल मापाने भरलेली प्रति निप ३५ रू प्रमाणे एकुण २१३५/— रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूद्ध कलम ६५ ई मदाका प्रमाणे कारवाई करण्यात आली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर